**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १५ जुलै २०२५**

**ठळक बातम्या :**

- **भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं पृथ्वीवर आज पुनरागमन.**

- **गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधातली शिक्षा आणि दंडाची रक्कम वाढवण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन.**

- **गणपती उत्सवाकरता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाच हजार जादा गाड्या.**

- **एक जिल्हा, एक उत्पादन- 2024’ पुरस्कारात महाराष्ट्राची चमकदार कामगिरी, कृषी आणि गैर कृषी क्षेत्रात रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी.**

**ॲक्सिओम फोर**

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी यांचं ॲक्सिओम फोर मोहिमेनंतर पृथ्वीवर पुनरागमन झालं आहे. कॅलिफोर्निया नजीकच्या समुद्रकिनाऱ्यालगत त्यांचं यान उतरलं. लखनौ इथं शुक्ला यांच्या घराजवळ त्यांच्या पुनरागमनाबद्दल जल्लोष साजरा करण्यात आला. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील. शुक्ला यांनी आपल्या मुक्कामात भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असणारे, सात सूक्ष्म गुरुत्वाकर्षणविषयक प्रयोग केले आहेत.

**<u>इलेक्ट्रिक वाहन उत्पादन</u>**

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, टेस्ला एक्सपीरियन्स सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केला.जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्माता ,टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला आहे. मुंबईत त्यांच्या पहिल्या एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहने प्रोत्साहनासाठी अत्यंत डायनॅमिक पॉलिसी राबवली आहे. यामध्ये चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, कर सवलती व मॅन्युफॅक्चरिंगसाठी विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. येत्या काळात महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उद्योगात देशात आघाडीवर असेल. तसेच मुंबईनंतर भारतातील आणखी दोन शहरांमध्ये सेवा विस्तारित केली जाणार असून, मुंबईत चार मोठे चार्जिंग हब आणि ३२ चार्जिंग स्टेशन उभारली जात आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**<u>बेघरमुक्त राज्य-विधानसभा</u>**

राज्याला बेघरमुक्त करण्याच्या दिशेनं प्रयत्न सुरू असून, राज्यातली प्रधानमंत्री आवास योजनेची प्रतीक्षा यादी संपली असल्याची माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सदनात दिली. यावर्षी केंद्र सरकारने सर्वाधिक ३० लाख घरे महाराष्ट्राला मंजूर केली असून, त्यातल्या २० लाख घरांना निधी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

***“प्रधानमंत्री आवास योजने’सोबत ५० हजार रुपये आपण ॲडिशनल आता त्या ठिकाणी देतो आहोत. कारण आपला प्रयत्न आहे की, ही सगळी घरं, ३० लाख घरं ही पहिल्या दिवशीपासून सोलर घर असली पाहिजे. या ३० लाख कुटुंबांना विजेचं कुठलंही बिल येऊ नये याद्दष्टीनं ५० हजार रुपये आपण अधिकचे दिलेले आहेत. त्यामुळे मला असं वाटतं की, एक प्रकारे देशामध्ये महाराष्ट्राचे एक नवीन मॉडेल ‘बेघरमुक्त महाराष्ट्र’चा आपण तयार करत आहोत.”***

राज्यभरातल्या बेघरांचं सर्वेक्षण महिनाभरात पूर्ण होण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना सौर प्रकल्प राबवण्यासाठी राज्य सरकार ५० हजार रुपये आर्थिक मदत देत आहे, यामुळे त्यांचं वीज बिल शून्यावर यायला मदत होईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**गुंतवणूकदारांची फसवणूक-विधानसभा**

मोठ्या परताव्याचं आमीष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधातल्या शिक्षेचा कालावधी आणि दंडाची रक्कम वाढवण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. सदस्य अमोल खताळ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. अशा गुन्ह्यातल्या आरोपी कंपनीची मालमत्ता शोधणं, त्या मालमत्तेचं मूल्यांकन करणं आणि खटल्याचा जलद निपटारा करण्यासाठी पोलिसांना मदत करणं, यासाठी राज्य सरकार विशेष व्यवस्था निर्माण करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**डॉ.पंकज भोयर-विधानपरिषद**

राज्यातील रात्रशाळांमध्ये कार्यरत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन, नेमणूक व सेवा अटींमध्ये असलेल्या विसंगती दूर करण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, असे राज्यमंत्री डॉ पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत सांगितले. डॉ.भोयर म्हणाले, शासनाचा उद्देश शिक्षण प्रवाहाबाहेर असलेल्या घटकांना रात्रशाळांमार्फत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे असून विविध शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात मागण्या केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गठीत समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुधारित धोरण लागू करण्यात येणार आहे.

**जादा गाड्या**

२७ ऑगस्ट २०२५ रोजी श्री गणरायाचे आगमन होत असून ,बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. मुंबईतील कोकणाच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी ,एसटी महामंडळाने यंदा २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान ५००० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते गणपती उत्सवाच्या जादा वाहतूकीच्या अनुषंगाने मंत्रालयातील आपल्या दालनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. सदर बसेस आरक्षणासाठी npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून

देण्यात येत असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या MSRTC Bus Reservation ॲपव्दारे, उपलब्ध होणार आहे.

**<u>एक जिल्हा एक उत्पादन</u>**

एक जिल्हा एक उत्पादन 2024 अंतर्गत महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली असून राज्याला अ श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. यासह रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला या जिल्ह्यांनी कृषी आणि गैर-कृषी क्षेत्रातील आपल्या विशिष्ट उत्पादनांसाठी सुवर्ण, रौप्य, कांस्य आणि विशेष उल्लेख पुरस्कार पटकावले आहेत. काल  भारत मंडपममध्ये राष्ट्रीय 'एक जिल्हा, एक उत्पादन' (ODOP) 2024 पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले. जागतिक स्तरावर 'आंब्यांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा रत्नागिरी जिल्ह्याचा हापूस आंबा यंदाही अव्वल ठरला आहे. कृषी क्षेत्रातील 'अ श्रेणीअंतर्गत जिल्ह्याने प्रथम स्थान मिळवले आहे. नागपूर जिल्ह्याच्या प्रसिद्ध संत्र्यांनी कृषी क्षेत्रातील अ श्रेणीअंतर्गत द्वितीय स्थान प्राप्त केले असून नागपूर संत्र्यांनी आपल्या रसाळ चवीने आणि जागतिक दर्जाच्या गुणवत्तेने देश-विदेशात ख्याती मिळवली आहे.  रौप्यपदकाचा पुरस्कार नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी स्वीकारला. अमरावती जिल्ह्याने आपल्या मंदारिन संत्र्यांसाठी कृषी क्षेत्रातील 'अ'श्रेणी अंतर्गत तृतीय स्थान मिळवले. नाशिकने आपल्या द्राक्षे आणि मनुकांसाठी (ग्रेप्स अँड रेझिन्स) कृषी क्षेत्रातील श्रेणी 'अ' अंतर्गत विशेष उल्लेख पुरस्कार मिळवला. अकोला जिल्ह्याने गैर-कृषी क्षेत्रातील श्रेणीतील ब अंतर्गत कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी विशेष उल्लेख पुरस्कार प्राप्त केला आहे.

**<u>आशा पठाण</u>**

मुख्यमंत्री सचिवालयातील सहसचिव ,आशा पठाण (निचत) यांना भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नती मिळाली आहे. केंद्र शासनाच्या, पर्सनल पब्लिक ग्रिवन्सेस ॲण्ड पेंशन मंत्रालयाच्या ,पर्सनल व ट्रेनिंग विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्राच्या महसूल सेवेतील 12 जेष्ठ अधिकारी भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नत झाले आहे.

**<u>इग्नू</u>**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, अर्थात इग्नूच्या विविध ३५० अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून, इच्छुक विद्यार्थ्यांना आज १५ जुलै २०२५ पर्यंत विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन प्रवेश घेता येणार आहे. नोकरी, व्यवसाय, घरकाम इत्यादीमुळे नियमित शिक्षणासाठी वेळ न देऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इग्नूने, मुक्त आणि दूरस्थ शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थी आपल्या पात्रतेनुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम निवडू शकतात. इग्नूची अध्ययन केंद्रे नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती आणि नांदेड येथे उपलब्ध असून, विद्यार्थी आपापल्या सोयीप्रमाणे केंद्र निवडू शकतात, अशी माहिती इग्नू नागपूर केंद्राचे विभागीय संचालक डॉ.लक्ष्मण कुमारवाड यांनी दिली.

**<u>हवामान</u>**

विदर्भातील नागपूर, गोंदिया, भंडारा आणि अमरावती जिल्ह्यातील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळीवारे आणि सौम्य ते मध्यम पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान खात्यातर्फे वर्तवण्यात आली आहे.

*****